महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**कार्यकारी अभियंता**

**५०० एम.डब्लू.,नवीन पावर हाऊस,**

**४०० के.व्ही.आर.एस विभाग**

**एमएसईटीसीएल, खापरखेडा**

**Email Id-ee4170@mahatransco.in**

**४००/केव्ही/आर.एस./मांस/विभाग/खापरखेडा/** 855 **दिनांक:** 7/08/2024

## शिकाऊ उमेदवार कायदा १९६१, अंतर्गत सत्र २०२४-२५ करीता प्रतीक्षा यादीतून निवड झालेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी

१. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री व्यवसायात उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांकरिता ४०० के.व्ही.आर .एस. विभाग खापरखेडा करीता एकुण ६ जागांकरिता शिकाऊ उमेदवारी करीता एक वर्ष कालावधी करीता ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम दि.०३.०७.२०२४ पर्यंत तसेच आवश्यक कागदपत्रासहित ऑनलाईन फॉर्म सादर करण्याचा अंतिम दि. ०७.०७.२०२४ होता.

२. प्राप्त झालेल्या ऑनलाईन व ऑफलाईन अर्जानुसार प्राप्त एस.एस.सी. तसेच आय.टी.आय.(विजतंत्री) च्या एकत्रित गुणांच्या सरसरीच्या आधारावर आणि प्रवर्गनिहाय आवश्यक सामाजिक आरक्षणाच्या आधारे तात्पुरती निवड तथा प्रतिक्षा यादी तयार करण्यात आलेली आहे.

३. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणून शिकाऊ उमेदवाराकरीता उमेदावाराचा कोणताही हक्क राहणार नाही. तात्पुरती निवड यादी हि उमेदावारांची शैक्षणिक आहर्ता, जात प्रमाणपत्र व इतर अटी व शर्ति पूर्ण करण्याच्या अधीन राहून आहे. त्यामुळे जर उमेदवार म्हणून निवड होण्यासाठीची पात्रता धारण करीत नसल्यास किंवा आवश्यक अटी व शर्तिचा भंग होत असल्यास सबंधित उमेदावारांची उमेदवारी/निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

४. तात्पुरती निवड झालेल्या सर्व उमेदवारांना आवश्यक सर्व कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस शैक्षिणक पात्रतेसंबधी गुणपत्रिका/प्रमाणपत्रे,सामाजिक आरक्षणाकरीता ज्या प्रवर्गातुन अर्ज सादर केलेला आहे त्या प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र,प्रगत गटात मोडत नसल्याने प्रमाणपत्र (नॉनक्रिमीयर प्रमाणपत्र),आर्थिक व सामाजिक दृष्टया दुर्बल घटकात अर्ज केलेल्या उमेदवारांना (EWS Certificate), अधिवास प्रमाणपत्र ,शाळा सोड्ल्याचा दाखला इत्यादी मुळ प्रमाणपत्र व त्यांच्या साक्षाकित झेरॉक्स प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.जर उमेदवार कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस वरीलपैकी मुळ प्रमाणपत्र दर्शविन्यात असमर्थ ठरल्यास किंवा मुळ प्रमाणपत्र व अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्रामध्ये तफावत आढळल्यास संबधित उमेदावाराची निवड रद्द करण्यात येईल.

५. तात्पुरती निवड झालेल्या उमेदावारापैकी कागदपत्रे पडताळणीत अपात्र ठरल्याने तसेच पडताळणीसाठी विहित मुदतीत हजर न झाल्याने अथवा कागदपत्र पडताळणीत पात्र ठरूनही दिलेल्या ठिकाणी विहित मुदतीत रुजू न झाल्याने रिक्त असलेल्या जागाकरीता प्रतीक्षा यादीतील क्रमवारीने प्रवर्गनिहाय उमेदवारांची निवड तथा पुनश्च यादी लावण्याचे अधिकार या कार्यालयाकडे राहतील .

६. तात्पुरती निवड यादी व प्रतीक्षा यादी तयार करताना सर्व प्रकारची शहानिशा केलेली आहे. तथापि अनावधाने किवा मुद्रण दोषा मुळे झालेल्या चुका वेळोवेळो सुधारित करण्यात येतील.

७. निवड न झालेल्या व प्रतीक्षा यादीतील उमेदावारांनी कुठल्याही प्रकारचे फोन,ई-मेल किवा पत्रव्यवहार या कार्यालयाकडे कड़े करू नये. उमेदवाराकडून आलेल्या कोणत्याही पत्राची व ई-मेलची दखल घेण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

८. तात्पुरत्या निवड यादीतून निवड झालेल्या उमेदवारांनी दि.०७.०८.२०२४ ते १२.०८.२०२४ पर्यंत कार्यकारी अभियंता (यांचे कार्यालय) ४०० के.व्ही.आर .एस. विभाग खापरखेडा या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.१५ पर्यंत सर्व मुळ प्रमाणपत्र (१ संच साक्षांकित झेरॉक्स प्रतिसह) पडताळणीकरीता हजर रहावे.दि.१२.०८.२०२४ नंतर येना-या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

९. कागदपत्र पडताळणीसाठी येणा-या उमेदवारांना कुठल्याही प्रकारच्या प्रवासखर्च किवा इतर खर्च दिल्या जाणार नाही.सर्व उमेदवारांना स्वखर्चाने कागदपत्र पडताळणी करीता उपस्थित रहावे लागेल.

४०० के.व्ही.आर .एस. विभाग खापरखेडा या विभागात निवड झालेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी खालीलप्रमाणे आहेत.

**Selection List** **Proforma-A**

**OPEN Category**

| Sr. No. | Name of Candidate & Application Coad | Cast | % Scored in SSC | % Scored in ITI | Average 50% | Remark |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Aniket Anandrao Meshram AP0624142307 | SC | 88.6 | 83.77 | 86.18 | Selected against Open |
| 2 | Ankita Dnyaneshwar Shekhar AP0624134295 | NT-C | 82.6 | 89.25 | 85.93 | Selected against Open |

**SC/ST Category**

| Sr. No. | Name of Candidate & Application Coad | Cast | % Scored in SSC | % Scored in ITI | Average 50% | Remark |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Anusaya Ramdas Burkule AP072414608 | ST | 78.8 | 86.00 | 82.40 | During 2022-23 recruitment, reservation given to SC Category Therefore, point rotated to ST category |

**VJ-A/NT-B/NT-C/NT-D /SBC Category**

| Sr. No. | Name of Candidate & Application Coad | Cast | % Scored in SSC | % Scored in ITI | Average 50% | Remark |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Isha Mohan Holkar AP072414873 | NT-C | 70 | 89.92 | 79.96 | During 2022-23 recruitment, reservation given to NT-B Category Therefore, point rotated to NT-C category as per ,merit |

**OBC Category**

| Sr. No. | Name of Candidate & Application Coad | Cast | % Scored in SSC | % Scored in ITI | Average 50% | Remark |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Shrushti Suresh Chouriwar AP0624139733 | OBC | 79.6 | 86.33 | 82.97 | |

**SEBC/EWS Category**

| Sr. No. | Name of Candidate & Application Coad | Cast | % Scored in SSC | % Scored in ITI | Average 50% | Remark |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Yash Ishwar Meshram AP072409564 | SC | 87 | 83.17 | 85.08 | Candidate of SEBC/EWS not available, Selected as per merit |

कार्यकारी अभियंता
४०० के व्ही ग्रहण वि.
(मराविपांक) खापरखेडा